• Age - Chances of obesity increases with the age. • Gender - females are more prone than males. • Genetic factors • Familial tendency • Physical inactivity • Endocrine factors • Drugs - Corticosteroids, insulin, contraceptive pills • Food habits - Eat between the meals, taking sweet food, refined food and fats • Psychosocial factors - emotional disturbances.

**Factors which are inversely proportional to obesity -** • Education • Socio- economic status

**Assessment of obesity:**

A] Body weight - Most probably used method is BMI

1) BMI ( Quetelet's index) $\frac{\text{Wight (Kg)}}{\text{Height (m)}^2}$

2) Ponderal index $\frac{\text{height (cm)}}{\sqrt[3]{\text{Cube root of bod weight (kg)}}}$

3) Brocas index height (cm) upon 100

B] Skin fold thickness - It is rapid and non invasive method. Several varieties of calipers are used for this. Measurement is taken at all four sites - mid triceps, biceps, subscapular and suprailiac region.

Assessment - Sum of the measurement should be <40 mm in boys and <50 mm in girls.

C] Waist circumference and Waist: Hip ratio (WHR) It is an approximate index of intra abdominal fat mass and total body fat.

1) There is an increased risk of metabolic complications with waist circumference >102 cm in Men and >88 cm in Women.

2) High WHR (>1.0 in Men and >0.85 in women) indicates abdominal fat accumulation.

**Classification of obesity according to BMI:**

| | BMI |
|---|---|
| Under weight | <18.50 |
| Normal range | 18.50 - 24.99 |
| Over weight | = 25.00 |
| Pre obese | 25.00 - 29.99 |
| Obese class I | 30.00 - 34.99 |
| Obese class II | 35.00 - 39.99 |
| Obese class III | = 40.00 |

**Relative threats due to obesity :**

**Greatly increased risk -** NIDDM, Dyslipidaemia, Insulin resistance, Breath lessness, sleep apnea, Gall bladder diseases

**Moderately increased risk -** CHD, HTN, Osteoarthritis, Hyperuricaemia and gout

**Slightly increased risk -** Impaired fertility, PCOS, Reproductive hormone abnormalities, Lowback ache etc.

**Discussion - Causes of obesity according to Ayurvedic Samhita -** According to Acharya Charaka causes of obesity (sthauluya) are as follows : In Charaka Samhita while giving information about eight types of condemned people they include obese person as one of them. And detail description about the same is also given in that chapter only.

**१) अतिसम्पूरणात् – अतिभोजनात** (over intake)

**मात्रावत् आहार – मात्रावद्धयशनमशितमनुपहत्य प्रकृतिं बलवर्णसुखायुषा योजयत्युपयोक्तारमवश्यमिति। (च.सू.५/८)**

**---मात्रावद्धि – आयुरेव विवर्धयति केवलं, न चोष्माणमुपहन्ति, अव्यथंच परिपाकमेति (च.वि.१/२४(३))**

Above are the effects of Matravat Ahar which include increase in strength, color, tone of the body. Also it increases the life. These things happen due to food taken in proper quantity which does not affect the agni and so digestion occurs unaffectedly. Rather it also helps to increase agni.

**यथाग्न्यभ्यवहारोऽग्निसन्धुक्षणानां... (च.सू.२५/४०)**

In case of over intake it affects agni and produce agnimandya. It produce prakopa of all three doshas.

**अतिमात्राशन – आमप्रदोषहेतूनाम् (च.सू.२५/४०)**

**अजीर्णाध्यशनं – ग्रहणीदूषणानाम् (च.सू.२५/४०)**

**अतिमात्रं पुनः सर्वदोषप्रकोपणमिच्छन्ति कुशलाः। (च.वि.२/७)**

Atimatra ahar
↓
Anavaha, Rasavaha, Purishvaha Srotas dushti
↓
Agnimandya
↓
Amanirmiti
↓
Apachit ahar rasa
↓
Apachit Dhatu Utpatti
↓
Apachit Meda Dhatu Utpatti
↓
(Uttarottar Dhtvagni Mandya)
↓
Sthaulya

2) **अति गुरू, मधुर, शीत, स्निग्धोपयोगाद –**

Excessive intake of heavy, sweet, cold and unctuous food , all of them causes dushti of Rasavaha srotas. Mansavaha srotas dushti occurs due to unctuous food in excess quantity.

**स्निग्धगुरुमधुरपिच्छिलशीत....श्लेष्माप्रकोपमापद्यते।। (च.नि.१/२५)**

**गुरुभोजन –दुर्विपाककराणाम् (च.सू.२५/४०)**

**...गुरुणि पुनर्नाग्निसन्धुक्षणस्वभावान्यसामान्यात्, अतश्चातिमात्रं दोषवन्ति..।। (च.सू.५/६)**

Hence it concludes that Guru ahar (heavy meal) in excess produces agni mandya. Also it produces prakopa of kapha dosha and so it affects digestion.

**मधुररस–**

**कुरुतेऽत्युपयोगेन स मेदः कफजान् गदान्।**

**स्थौल्याग्निसादसन्यास मेह गण्डार्बुदादिकान्।।** (अ.ह्र.सू.१०/९)

Excess quantity of sweet food produces Medaj and Kaphaj roga. There is direct reference about producing sthaulya due to Madhur rasa in excess quantity, by producing Agni mandya, Kapha dushti and Meda dhatu dushti.

**अतिशीत ( Cold Food) -** It increases both Vata and Kapha dosha. It has total opposite chracteristics of Ushna guna of agni which affects the digestion.

**अतिस्निग्ध** - It produces Kapha prakopa.

**पाण्डुता गौरवं जाड्यं पुरिषस्याविपक्वता।**

**तन्द्रारुचिरुत्क्लेशः दृयादतिस्निग्धलक्षणम्।।** (च.सू.१३/५९)

Though these symptoms are explained in Snehadhyay , they can be applicable for food also.

Hence altogether they produce dushti of rasavaha, mansavaha and medovaha srotas. It produces agnimandya and kapha prakopa. As a result it affects the mansa samhanana producing mansa shaithilya. Apachit meda dhatu in which there is increase in pichhil guna and kleda guna of kapha produces meda shaithilya. Both of them results in sthaulya.

3) **अव्यायाम** (Lack of Physical Exercise ) -

**व्यायाम – स्थैर्यकराणाम्**

**...दोषक्षयोऽग्निवृद्धिश्चः व्यायामादुपजायते।। (च.सू.७/३२)**

**श्लेष्मक्षयो अभिप्रेतः यदिऽग्नि कर्तुत्वेन त्रिदोषक्षयोऽपि (च.सू.७/३२ चक्र.टिका) .... दीप्तोऽग्नि मेदसः क्षयः..।। (अ.ह्र.सू.२/१०)**

All of these are effects of exercise which causes agni vrudhi, kshay of meda dhatu and kapha dosha (Tridosha kshaya). It also provides stability to body.

But in case of physical inactivity **(अव्यायाम)**

**अव्यायाम –**

**उपहननस्य अग्नेः (च.चि.१४/९)**

**कफस्य प्रकोप (च.नि.१/२५)**

It causes agni mandya, also it produces kapha prakopa. Physical inactivity is hetu of medovaha srotas dushti. All of these together produces apachit meda dhatu resulting in sthaulya.

4) **अव्ययाय** (Abstinence from sexual intercourse) -

**ब्रम्हचर्य–आयुष्यानां (च.सू.२५/४०)**

As there is no sexual intercourse it increases the shukra in the body producing shukra dhatu vrudhi. Shukra inturn converts into oja.

**ओजस्तु तेजो धातूनां शुक्रान्तानां पर स्मृतम्।**(अ.ह्र.सू.११/३७)

When there is shukra vrudhi it also increase the oja.

**ओजो विवृद्धौ देहस्य तुष्टिपुष्टिबलोदयः।।**(अ.ह्र.सू.११/४१)

But when Abstinence from sexual intercourse occurs forcefully it creates shukra dhatu dushti.

**अकाल योनिगमनात् निग्रहात् अतिमैथुनात्।शुक्रवाहिनी दुष्यन्ति...।। (च.वि.५/१८)**

Hence when shukra vrudhi occurs due to dushta shukra , it also affects the oja. Body gets nourish excessively which produce sthaulya.

**5) दिवास्वाप (Days leep) -** One who doesn't sleep at night or diseased person is allowed to sleep during day time but it should be before meals.

According to Acharya Vagbhata and Acharya Charaka it produces Kaph and Pitta prakopa. But according to Sushrutacharya it produces tridosh prakopa. Also it is a hetu of Mansavaha and Medovaha srotas dushti.

**दिवास्वप्न.... कफप्रकोपमाद्यते। (च.नि.१/२५)**

**कफवृद्ध लक्षणे–**

**श्लेष्माऽग्निसदन...आलस्यगौरवम्।।श्लथाङ्गत्वं..। (अ.ह्र.सू.११/७–८)**

Due to kapha there is increase in Gurutva and shaithilya of mansa and meda dhatu, which produces Sthaulya.

**6) हर्षनित्यत्वाच्च (Uninterrupted cheerfulness) -**

**हर्षः प्रीणनानां (च.सू.२५/४०)**

Cheerfulness or happy feeling help to get body nourished properly. Also this feeling is a sign of satisfaction.

**निवृत्तिः पुष्टिकराणां (च.सू.२५/४०)**

Hence when there is uninterrupted cheerfulness it produces extra nourishment which results in sthaulya.

**7) अचिन्तनात् (lack of mental exercise) -**

**चिन्ता–**

**कफोपशमनी (अ.ह्र.सू.७/६३)**

**मेदोऽनिश्लेष्मनाशनी (अ.ह्र.सू.१३/११)**

When there are tensions they results into decrease in Kapha dosha and meda dhatu, which are important to produce sthaulya.

As this did not happen with those who have lack of mental exercise , increases kapha dosha and meda dhatu which causes sthaulya.

**8) बीजस्वभावात् – स्थूलमातापितृजन्यत्वात्**

It is a hereditary character or genetic constitution which transfer to the progeny from its parents through chromosomes. Mutation at chromosomal level may produce obesity and then it will pass to successive generations.

According to Acharya Vagbhata causes of obesity (sthauluya) are as follows:

**अनपेक्षितमात्रादी सेविते कुरुतस्तु ते।**

**अतिस्थौल्यातिकार्श्यादीन् वक्ष्यन्ते ते च सौषधाः।।**

**(अ.सं.सू.२४/१३)**

Here for Sthaulya (obesity) Anapekshit matra means over intake i.e. addhyashana, ajirnadhashyana. The suffix 'di ' includes all possible causes about amount, consistency, type, guna, rasa of the food. It also includes the state of the person it is taking i.e. if he is hungry or not , is there occurrence of jirna aahar lakshan or not.

**Causes of obesity according to modern texts -** Modern texts also describes causative factors of obesity. some of them can be correlate with ayurvedic hetus of sthaulya.

**Following are some correlations :**

**1) Physical inactivity-** avyayam

**2) Genetic factors and familial tendencies-** Bijaswabhavat

**3) Food habits like eat between the meals i. e. over intake-** Atisampurnat

**4) Taking sweet food in excess-** Ati madhur sevan

**5) Refined food and fats-**Atisnigdhopayoda

Other factors include:

**6) Endocrine factors and Drugs-**

**a) Corticosteroids -** If their level increases in the body it produces Cushing disease.

Corticosteroids promote lypolysis through glucagon, GH, Adr and thyroxine. Redistribution of fats occurs as a result of corticosteroids. In which subcutaneous tissues over extremities loses its fat which deposits over face, neck and shoulder and hence person appears obese.

**b) Insulin-** Insulin increases the glucose uptake and store it as fat and glycogen.
It inhibits lypolysis in adipose tissue.

**c) Hypothyrodism-** T4 and T3, these are the hormones which indirectly enhance the lipolysis by potentiating the action of catecholamine's and other lipolytic hormones. In case of Hypothyrodism, there is decrease in the level of T4 which results in weight gain.

**7) Psychosocial factors-** (emotional disturnabces)

Emotional disturbances occurs due to stress, hormonal disturbances or as a sign of depression, anxiety, frustration and loneliness etc.

As overeating is one of the symptom of above mentioned psychological conditions, person starts gaining weight.

**Factors inversely proportional to obesity -**

**1) Education -** As people getting educated there is increase in the awareness about health and so the level of obesity decreases.

**2) Socio-economic status -** When people get financially rich, due to social status they have

to look slim. Also they able to manage to take proper nutritious food and gym like exercising activities. Hence they get rid from the obesity.

But in case of people with low socio-economic group they are unable to get such nutritious food every time. Also due to high energy requirement for physical activity and to maintain culture status these people generally have large body size.

**Conclusion -** As obesity (Sthaulya) is a lifestyle disorder. In the above mentioned causes except hereditary quality i.e. familial tendencies and genetic factors all other factors can be modified for the better health.

All other factors are occur due to our daily routine and food habits. So according to ayurveda it can be classified as - **प्रज्ञापराधजन्यव्याधी**

By practicing Yoga or doing exercise daily, maintaining mental health and managing our food habits we can interrupt the cycle towards obesity.

**References:** 1) K. Park. Park's textbook of Preventive and social medicine. M/s Banarsidas Bhanot Publishers, Jabalpur. 19th edition. Feb2007.Chapter no.6. p332-335.

2) Vd. Joshi V, Vd. Joshi N. Ayurvediya Mahakosh arthat Ayurvediya Shabdakosh, Sanskrit tom sanskrit. 1st part. Maharastra rajya Sahitya Ani Sanskriti Mandal, Mumbai.

3) Acharya Shukla V.,Prof. Tripathi R. Marathi translation of Charaka samhita of Agnivesha elaborated by Charaka and Drudhabala with the Vaidyamanorama hindi commentry.1st Part (Pratham Khanda). Translated by Vd. Kale V. Chaukhamba Sanskrit Pratishthan.2016. Sutrasthan Adhyay no.- 5,7,13,21,25, Vimansthan Adhyay no.- 1,2,5, Nidansthan Adhyay no.- 1.

4) Singh R.H. Charaka samhita of Agnivesha elaborated by Charaka and Drudhabala with the Ayurvedadipika commentary by Sri Chakrapanidatta. Edited by Vd Trikamji Y. Chaukhamba Surbharati Prakashan, Varanasi.2011. SutrasthanAdhyay no. 7.

5) Acharya Shukla V.,Prof. Tripathi R. Marathi translation of Charaka samhita of Agnivesha elaborated by Charaka and Drudhabala with the Vaidyamanorama hindi commentry.2nd Part (Dvitiya Khanda). Translated by Vd. Kale V. Chaukhamba Sanskrit Pratishthan.2014.Chikitsasthan Adhyay no.- 14

6) Dr. Kunte A.,P. Navare K. Ashtanghrudayam of Shrimad Vagbhat with Sarvangasundara commentary of Arundatta and Ayurvedarasayana commentary of Hemadri. Edited by Pt. Paradakara H. Chaukhamba Sanskrit Sansthan,Varanasi. 2015. Sutrasthan Adhyay no.-2,10,11.

7)Prof. Mitra J. Ashtangasamgraha of Vahata or Vruddha Vagbhata with Sasilekha Sanskrit Commentary by Indu. Edited byDr. Sharma S. Chaukhamba Sanskrit Series Office, Varanasi. 2012Sutrasthan Adhyay no.24.

8) Tripathi K.D. Essentials of Medical Pharmacology. 7thedition.2013. Jaypee brothers medical publishers(P) LTD. Chapter no.18,19,20.

9) En.m.wikipedia.org.(2019).Obesity.[online] Available at: https://en.m.wikipedia.org/wiki/Obesity [Accessed 9Aug2019]

10) Sangwan P. Sthaulya - A Conceptualized Study - A Review Article. International Ayurvedic Medical Journal [online] Jan2017. [Cited 6Aug2019].Volume5. Issue 1.Available from: http://www.iamj.in /posts/images/ upload/248_253.pdf

## डॉ. सिद्धार्थ परचुरे ह्यांचे दुहेरी यश

**अभिनंदन!**

कायचिकित्सा विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. सिद्धार्थ सुहास परचुरे ह्यांना **National Seminar on "Ayurvedic Management of skin Disorders'** ह्या अंतर्गत दि. ३-२-२०२० रोजी सादर केलेल्या शोध निबंधास अध्यापक संवर्गात द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले.

तसेच **Birdies Club** तर्फे घेण्यात आलेल्या बॅडमिंटन स्पर्धेत श्री. अजय रावेल ह्यांच्या साथीत प्रथम पारितोषिक प्राप्त झाले.

आयुर्विद्या मासिक समितीतर्फे डॉ. सिद्धार्थ सु. परचुरे ह्यांचे दुहेरी यशाबद्दल अभिनंदन!

**डावीकडून - डॉ. सिद्धार्थ परचुरे, श्री. रविल व Birdies Club चे पदाधिकारी**

# राष्ट्रीय शिक्षण मंडळ
# पंचवार्षिक निवडणूक (२०२०-२०२५)

राष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या नियामक मंडळासाठी व आयुर्वेद रसशाळा समिती व मेहेंदळे दवाखाना समिती ह्यासाठीच्या पंचवार्षिक निवडणूका नुकत्याच पार पडल्या. सर्व निवडणूका बिनविरोध झाल्याचे निवडणूक अधिकारी ॲड. विनोद बापट ह्यांनी जाहीर केले व पुढील सदस्य निवडून आल्याचे जाहीर केले.

**नियामक मंडळ –**

**संवर्ग – पेट्रन –**


१) डॉ. पुराणिक दिलीप प्रभाकर २) ॲड. पाटील श्रीकांत नारायण

**संवर्ग –सिंपथायझर –**


१) डॉ. डोईफोडे विजय विश्वनाथ २) डॉ. परचुरे सुहास नारायण

**संवर्ग – सामान्य सभासद –**


१) डॉ. सातपुते मधुकर रामचंद्र २) डॉ. धडफळे भालचंद्र गणेश

**संवर्ग – फेलो –**

१) डॉ. भागवत भालचंद्र क्रष्णाजी

**संवर्ग – आजीव सभासद –**


१) डॉ. गांगल रमेश नारायण २) डॉ. गव्हाणे संजय गुलाबराव

**संवर्ग – अध्यापक/वैद्यकीय अधिकारी –**

१) डॉ. हुपरीकर राजेंद्र शशीशेखर

**आयुर्वेद रसशाळा समिती**


१) डॉ. कुलकर्णी प्रमोद वासुदेव २) डॉ. रानडे मंदार

**मेहेंदळे दवाखाना समिती**

१) डॉ. घनवट शेखर मुरलीधर

टिळक आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य हे नियामक मंडळाचे पदसिद्ध सदस्य असल्याने त्यासाठी निवडणूक होत नाही.

**सर्व यशस्वी उमेदवारांचे आयुर्विद्या मासिक समितीतर्फे हार्दिक अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा!**

# राष्ट्रीय शिक्षण मंडळ – ९६ वा वर्धापनदिन समारंभ – दि.९ फेब्रुवारी २०२०

डॉ. दिलीप पुराणिक

राष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या ९६ व्या वर्धापनदिनानिमित्त टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या एन. आय.एम.ए. सभागृहात दुपारी ४ वाजता भव्य समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. समारंभास प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध शल्यचिकित्सक व प्रख्यात लेखक डॉ. अनिल गांधी उपस्थित होते. समारंभाचे अध्यक्षस्थान डॉ. विजय डोईफोडे ह्यांनी भूषविले. मान्यवरांचे हस्ते श्री धन्वंतरी पूजनाने समारंभाची सुरुवात झाली. प्रमुख अतिथी डॉ. गांधी व अध्यक्ष डॉ. डोईफोडे ह्यांचे हस्ते आरोग्य प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

भव्य व सुशोभित एन.आय.एम.ए. सभागृहात व्यासपीठावर डॉ. डोईफोडे, डॉ. गांधी, राष्ट्रीय शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. भा.कृ.भागवत, सचिव डॉ. दिलीप पुराणिक, कोषपाल डॉ. गांगल, डॉ. राजेंद्र हुपरीकर व डॉ. स. वि. देशपांडे, डॉ. परचुरे, डॉ. सातपुते, डॉ. धडफळे, ॲड. पाटील स्थानापन्न झाले होते.

श्री धन्वंतरी स्तवनाचे मंगल चरण आळविल्यानंतर डॉ. दि. प्र. पुराणिक ह्यांनी प्रास्ताविक भाषणात राष्ट्रीय शिक्षण मंडळ व मंडळाच्या घटक संस्थांनी गेल्या ९६ वर्षात केलेल्या प्रगतीचा आढावा घेतला व उपस्थितांचे हार्दिक स्वागत केले.

**मा. डॉ. अनिल गांधी यांचे हस्ते जीवन गौरव पुरस्कार स्विकारताना मा. डॉ. साठ्ये व सौ. साठ्ये.**

समारंभाचे अध्यक्ष डॉ. डोईफोडे व प्रमुख अतिथी डॉ. अनिल गांधी ह्यांच्या यथोचित सत्कारानंतर सर्व मान्यवरांचे हस्ते मंगलदीपाचे प्रज्वलन करून समारंभाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

पुण्यातील सुप्रसिद्ध नेत्रचिकित्सक डॉ. सुधाकर महादेव साठ्ये हे ह्यावर्षीच्या **''जीवन गौरव पुरस्काराचे''** मानकरी होते. त्यांच्या कारकिर्दीचा आढावा घेणाऱ्या सन्मानपत्राचे वाचन डॉ. मिहीर हजरनवीस ह्यांनी केले. त्यानंतर डॉ. गांधी व डॉ. डोईफोडे ह्यांच्या हस्ते बुद्धिमत्तेचे प्रतिक पुणेरी पगडी, शाल, सन्मानपत्र, भेटवस्तू, पुष्पगुच्छ व रोख रु. अकरा हजार अशा स्वरुपात डॉ. सु.म. साठ्ये ह्यांना प्रतिष्ठेचा जीवन गौरव पुरस्कार वितरीत करण्यात आला.

सत्कारास उत्तर देतांना डॉ. साठ्ये ह्यांनी राष्ट्रीय शिक्षण मंडळाप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

**'आयुर्विद्या इंटरनॅशनल २०२० Volume I** व **E-Ayurvidya'** चे प्रकाशन डॉ. गांधी व डॉ. डोईफोडे ह्यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रमुख अतिथी म्हणून मनोगत व्यक्त करताना डॉ. गांधी ह्यांनी राष्ट्रीय शिक्षण मंडळाने केलेल्या विकासात्मक प्रगतीचा गौरवपूर्ण शब्दात उल्लेख केला. तसेच ९६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या आरोग्य प्रदर्शनाची व डॉ. सु.म. साठ्ये ह्यांच्या आयुर्वेदातील संशोधनात्मक योगदानाची प्रशंसा केली.

राष्ट्रीय शिक्षण मंडळाचे वतीने आयोजित केलेल्या **''नानल चषक''** आंतरवैद्यकीय महाविद्यालयीन राष्ट्रीय स्पर्धांच्या आयोजक डॉ. मंजिरी देशपांडे ह्यांनी स्पर्धांचा भारतभरातील वैद्यकीय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त

**मंगलदीप प्रज्ज्वलन करताना डावीकडून – डॉ. सातपुते, डॉ. परचुरे, डॉ. भागवत, डॉ. गांगल, डॉ. पुराणिक, डॉ. गांधी, डॉ. धडफळे, डॉ. डोईफोडे, डॉ. हुपरीकर, व डॉ. स. वि. देशपांडे.**

प्रतिसाद स्पर्धांना लाभल्याचे सांगितले व सविस्तर अहवाल सादर केला. स्पर्धेतील पारितोषिक विजेत्यांना व्यासपीठावरील सर्व मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. वैद्य वृंदा साठ्ये लिखीत 'अग्निकर्म चिकित्सा' पुस्तकाच्या हिंदी आवृत्तीचे प्रकाशन अध्यक्ष डॉ. वि.वि. डोईफोडे ह्यांच्या हस्ते करंण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. डोईफोडे ह्यांनी राष्ट्रीय शिक्षण मंडळाने केलेल्या प्रगतीचा आढावा घेतला व भविष्यात संस्थेला प्रगतीच्या उच्च शिखरावर नेण्याची ग्वाही दिली.

डॉ. भालचंद्र भागवत ह्यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर समारंभाची टाळ्यांच्या गजरात सांगता झाली.

डॉ. मिहीर हजरनवीस व डॉ. विनया दीक्षित ह्यांच्या खुमासदार शैलीतील सूत्रसंचलनामुळे समारंभाच्या भव्यतेत व आकर्षकतेत मोलाची भर पडली.

# Report of the National Seminar on Ayurvedic Management of Skin Disorders (Twak Vikara)

**Dr. Mihir Hajarnavis**

**National Seminar on Ayurvedic Management of Skin disorders** was organized jointly by RSM's Center for Postgraduate Studies and Research in Ayurved of Tilak Ayurved Mahvidyalaya and Association of Integrated Medical Specialists of India on 2nd and 3rd February 2020. The scientific sessions and poster presentations were held on 2nd February 2020. The scientific session began with feast of knowledge by the lecture of Vd.Prashant Suru, a renowned Ayurvedic practitioner from Pune. He delivered his lecture on the Panchabhautik aspect of Skin Disorders. The panchamahabhuta theory, classification of herbs as per mahabhuta and case studies were presented in this lecture. Prof. S. V. Deshpande was the chairperson for this lecture.

This lecture was followed by the **Inaugural function.** Dr. V. V. Doiphode, President of Rashtriya Shikshan Mandal presided over the function. Dr. Vijay Warad, renowned Paediatric and allergy specialist was the Chief Guest for the function. He presented his views and experiences in the treatment of skin allergies. Dr. B. K. Bhagwat, Vice President R.S.M., Dr. D. P. Puranik, Director, C.P.G.S and R.A. and Secretary, R.S.M, Dr. V. N. Shendye President, A.I.M.S of India and Dr. S. V. Deshpande, Principal, T.A.M.V, were present on dais for the function.

The next scientific session was on The Ayurvedic management of Psoriasis. Dr. Sunil Vasistha, a senior Ayurved Consultant from Ahmedabad shared his experiences with case studies on this topic. Prof. Mukund Erande and Prof. Minakshi Randive were in the chair, co chair respectively for the session.

Vaidya Ramdas Avhad from Kopargaon, Ahmedenagar delivered his thoughts on Panchakarma practices in Skin disorders. He shared his experiences on panchakarma treatment- vaman, virechana, raktamokshan and other therapies in various skin ailments with case studies. Prof. Maya Gokhale and Prof. Manish Bhoyar were in the chair, co chair

**Inaugural Function: From Left - Dr. S.V. Deshpande, Dr. B.K. Bhagwat, Dr. V.V. Doiphode, Dr. Vijay Warad, Dr. D.P. Puranik, Dr. V.R. Dixit, Dr. M.S. Hajarnavis.**


**Release of Ayurvidya Issue dedicated to Skin Disorders. From Left - Dr. V.N. Shendye, Dr. S.V. Deshpande, Dr. B.K. Bhagwat, Dr. V.V. Doiphode, Dr. Vijay Warad, Dr. D.P. Puranik, Dr. V.R. Dixit, Dr. S.V. Patil, Dr. M.S. Hajarnavis.**

for the session.

Vaidya Pramod Kulkarni, Ayurvedic Twacharog consultant delivered his lecture with experiences related to eczema, ringworm, fungal skin diseases on the topic Ayurvedic management of Kshudra Kustha. Prof. N. V. Borse and Prof. Nilima Amrute were in the chair, co chair for the session.

The last scientific session was on the Clinical and Cosmetic Management of Facial Skin Disorders. Vaidya Sarita Vaidya delivered the lecture on this topic with live demo on the facial skin treatments. Prof. Minal Lad, Prof. Apoorva Sangoram were the chair, co chair for the session. There were around 400 delegates registered for the seminar. The organizing committee was felicitated at the hands of Prof. Dr. D. P. Puranik and Dr. V. N. Shendye after the seminar. Prizes of posters were given.

The posters were presented on different aspects of Ayurvedic Management of Skin disorders. Prof. Vidya Undale and Vaidya Sachin Kadlag were the examiners for posters.

Paper presentations were organized on 3/2/2020. Total 110 papers were presented. 24 papers by teachers and 86 papers in the PG students category were presented.

Vaidya Nilesh Kulkarni and Vaidya Laxman Lavgankar received the first prize, Dr. S. S. Parchure second prize and Dr. Vidya Naik third prize in teachers category. Prof. Vrinda Kaknurkar, Prof. Manjiri Deshpande, Prof. Indira Ujagare, Prof. Nilesh Kulkarni, Prof. Minakshi Randive, Prof. Anil Deshpande, Prof. Sangeeta Salvi and Prof. Mohan Joshi were the judges for the paper presentations.

Prof. Saroj Patil, Prof. Mihir Hajarnavis and Prof. Vinaya Dixit worked as Programme Directors for the seminar. Dr. D. P. Puranik was the 'Mentor' of event.

**Congratulations**

## Prof. Dr. Rajendra Huparikar appointed on Symbiosis University

**Dr. Rajendra Huparikar**

Recently, Prof. Dr. Rajendra Huparikar, Head of Panchakarma Dept. of Tilak Ayurved Mahavidyalaya has been nominated as Member of Governing Body of Symbiosis University of Applied Sciences, Indore. Dr. Rajendra Huparikar, has also been nominated as Member of Symbiosis Skills and Open Univeresity, Pune and Member of Board of Management of Skills and Open University, Pune.

Prof. Rajendra Huparikar is working as Executive Director of R.S.M.'s Chetan Dattaji Gaikwad Institute of Management studies.

Rashtriya Shikshan Mandal, Tilak Ayurved Mahavidyalaya, C.D.G.I.M.S, RIHSM and Ayurvidya Masik Samiti Congratulates Prof. R.S. Huparikar for the Nominations.

## Prof. Dr. Manjiri Deshpande nominated as Faculty on KLE University

**Dr. Manjiri S. Deshpande**

Dr. Manjiri S. Deshpande, Associate Professor of Rognidan, TAMV has been nominated as Member of the Faculty of Ayurved of KLE Academy of Higher Education And Research, Deemed To Be University, Belagavi, Karnataka. This appointment is for a period of two years. w.e.f. 1st Jan 2020.

Tilak Ayurved Mahavidyalaya, C.P.G.S. & R.A. and Ayurvidya Masik Samiti congratulate Dr. Manjiri Deshpande for this prestigious appointment.

## अभिनंदन!

# टिळक आयुर्वेद महाविद्यालयास पुणे म.न.पा. आयोजित स्पर्धांमध्ये पारितोषिके प्राप्त

**प्रा. डॉ. अपूर्वा संगोराम**

पुणे महानगरपालिका वृक्ष प्राधिकरणातर्फे आयोजित ४० व्या फळे, फुले, भाजीपाला प्रदर्शनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन श्री. मुरलीधर मोहोळ, महापौर, पुणे यांच्या हस्ते झाले.

या प्रदर्शनामध्ये टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या द्रव्यगुण व वनस्पती उद्यान विभागाने वनौषधी उद्यान स्पर्धा, औषधी व सुगंधी कुंड्या संग्रह, वृक्ष संवर्धन व संरक्षण इ. स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला.

या स्पर्धांमध्ये टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या द्रव्यगुण व वनस्पती उद्यान विभागास औषधी वनस्पती संग्रह, प्रथम व तृतीय क्रमांक, औषधी वनस्पती उद्यान, द्वितीय क्रमांक, औषधी संवर्धन व संरक्षण गटास तृतीय क्रमांक, तसेच त्वचा विकारांवर उपयुक्त वनस्पति स्टॉल विशेष सहभाग, सन्मानचिन्ह इ. पारितोषिके मिळाली.

या प्रदर्शनानिमित्त टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या द्रव्यगुण विभागाने त्वचा विकारांवर उपयुक्त वनस्पति या विषयावर प्रदर्शन आयोजित केले होते. त्वचा विकारांवर उपयुक्त वनस्पतींची एकत्रित माहिती मॉडेल, चार्ट्स, फोटोग्राफ इ. च्या माध्यमातून प्रदर्शित केली होती. या निमित्ताने **'घरोघरी वनौषधी'** ही पुस्तिका, **'आरोग्यदीप दिवाळी अंक २०१९'**, सवलतीच्या दरात उपलब्ध करण्यात आले. या प्रदर्शनास नागरिकांचा उत्कृष्ट प्रतिसाद लाभला.

दि. १६ फेब्रुवारी २०२० रोजी संभाजी उद्यानात आयोजित बक्षिस वितरण समारंभात हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रदर्शनानिमित्त आयोजित बक्षिस वितरण समारंभास वृक्षसंवर्धन समितीचे सदस्य श्री. हाजी गफूर पठाण, श्री. उमाले व उद्यान अधिक्षक श्री. अशोक घोरपडे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. महाविद्यालयातर्फे द्रव्यगुण व वनस्पती उद्यान प्रमुख डॉ. अपूर्वा संगोराम, द्रव्यगुण विभाग अध्यापिका डॉ. अस्मिता जाधव, डॉ. प्रज्ञा गाठे, डॉ. गौरी गांगल तसेच द्रव्यगुण विभागाच्या सर्व पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी हे पुरस्कार स्वीकारले.

या प्रदर्शनास राष्ट्रीय शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. दि.प्र. पुराणिक, कोषपाल डॉ. र.ना. गांगल, उपप्राचार्य डॉ. सरोज पाटील यांनी भेट देऊन या उपक्रमाचे कौतुक केले, तसेच महाविद्यालयाच्या अनेक अध्यापक, विद्यार्थी यांनीही भेट दिली. या प्रदर्शनात व स्पर्धांच्या आयोजनात द्रव्यगुण व वनस्पती उद्यान प्रमुख डॉ. अपूर्वा संगोराम, अध्यापक डॉ. अस्मिता जाधव, डॉ. स्नेहा जोशी, डॉ. प्रज्ञा गाठे, डॉ. गौरी गांगल तसेच द्रव्यगुण विभागाचे पदव्युत्तर विद्यार्थी, वै. स्वप्नाली, वै. रूपेश, वै. गायत्री, वै. परमेश्वर, वै. सलोनी, वै. शरमीन, वै. सुवर्णा, वै. वृषाली, वै. श्रीया तसेच उद्यानातील माळी श्री. बागुल व श्री. मोरे व द्रव्यगुण विभागाचे कर्मचारी श्री. कुंभार यांचा सक्रीय सहभाग होता.

या यशात राष्ट्रीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. वि.वि. डोईफोडे, उपाध्यक्ष डॉ. भा.कृ. भागवत, सचिव डॉ. दि. प्र. पुराणिक, कोषपाल डॉ. र.ना. गांगल, प्राचार्य डॉ. सदानंद देशपांडे, उपप्राचार्य डॉ. सरोज पाटील व डॉ. मिहीर हजरनवीस यांचे मार्गदर्शन लाभले.

पुरस्कार स्विकारताना डावीकडून–
डॉ. प्रज्ञा गाठे, डॉ. गौरी गांगल, डॉ. अस्मिता जाधव,
डॉ. अपूर्वा संगोराम.

डॉ. अपूर्वा संगोराम, डॉ. र. ना. गांगल, डॉ. अस्मिता जाधव,
डॉ. प्रज्ञा गाठे व पद्व्युत्तर विद्यार्थी.

डॉ. दि. प्र. पुराणिक, डॉ. सौ. पुरणिक, डॉ. अपूर्वा संगोराम,
डॉ. प्रज्ञा गाठे, डॉ. अस्मिता जाधव व पद्व्युत्तर विद्यार्थी.

# अविष्कार २०१९-२०२०

डॉ. मोहन जोशी

''महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक' आयोजित 'अविष्कार २०१९-२०२०' रिसर्च फेस्टिवल या स्पर्धेत टिळक आयुर्वेद महाविद्यालयातील एकूण ११ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. ६ वेगवेगळ्या संवर्गातून हा सहभाग होता. दिनांक २२ जानेवारी व २३ जानेवारी रोजी विद्यापीठात ही स्पर्धा संपन्न झाली. त्यात अभिमानाची गोष्ट म्हणजे ३० विद्यार्थ्यांमध्ये ८ विद्यार्थी टिळक आयुर्वेद महाविद्यालयाचे होते. ते पुढीलप्रमाणे –

| | Category | | | Rank |
|---|---|---|---|---|
| 1) | H.L.F. | Teacher | Dr. Mohana R. Joshi | 1st |
| 2) | C.M.L. | Teacher | Dr. Asmita M. Narkar | 1st |
| | | PG | Dr. Chandan B. Khairnar | 1st |
| | | PG | Dr. Mahesh V. Raut | 1st |
| 3) | AAH | PG | Dr. Vaibhavi V. Pathak | 1st |
| | | UG | Mr. Shubham Dhoot | 1st |
| 4) | P.S. | Teacher | Dr. Gauri J. Gangal | 2nd |
| 5) | E & T | Teacher | Dr. Pradnya H. Gathe | 2nd |

या विद्यापीठातंर्गत निवड झालेल्या ३० विद्यार्थ्यांना १४ व्या महाराष्ट्र राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ संशोधन स्पर्धेसाठी मुंबई विद्यापीठामध्ये दि. २८ जानेवारी ते दि. ३१ जानेवारी या कालावधीत पाठवण्यात आले. त्यापैकी टिळक आयुर्वेद महाविद्यालयातून ६ स्पर्धकांचा समावेश होता.


डावीकडून दुसऱ्या डॉ. नारकर

'१४ व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ संशोधन स्पर्धेत' एकूण महाराष्ट्र राज्यातील २० विद्यापीठांचा सहभाग होता. प्रथम सर्व स्पर्धकांकडून संशोधन प्रकल्पावर पोस्टर सादरीकरण झाले व त्यानंतर पुढे powerpoint presentation (अंतिम फेरी) round साठी आपल्या महाविद्यालयातील डॉ. मोहन जोशी, डॉ. अस्मिता नारकर व डॉ. चंदन खैरनार यांची निवड झाली.

त्यानंतर डॉ. अस्मिता मंगेश नारकर यांना अंतिम फेरीत C.M.L. संवर्गातून Teacher या गटातून '१४ व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ संशोधन स्पर्धा-अविष्कार २०१९-२०२०' मध्ये प्रथम पारितोषिक मिळाले. पारितोषिक म्हणून ट्रॉफी, प्रमाणपत्र व रू. ५०००/- प्राप्त झाले.

अभिनंदन!

## प्रा. डॉ. नंदकिशोर बोरसे ह्यांना Life Time Sushrut Award

टिळक आयुर्वेद महाविद्यालयातील शल्य विभाग प्रमुख डॉ. नंदकिशोर बोरसे ह्यांना नुकतेच मंगल मेडिकल अँड रिसर्च फाउंडेशनतर्फे **"Life Time Sushrut Award'** देवून गौरविण्यात आले.

Anorectal surgery च्या सेमिनार प्रसंगी सदर पुरस्कार डॉ. बोरसे ह्यांनी प्रमुख अतिथी खासदार मा. श्री. अमर साबळे ह्यांचे हस्ते स्वीकारला.

डॉ. बोरसे हे शेठ ताराचंद रामनाथ रुग्णालयाच्या नियामक मंडळाचे सदस्य व कोषपाल म्हणून कार्यरत आहेत.

राष्ट्रीय शिक्षण मंडळ, टिळक आयुर्वेद महाविद्यालय, सेंटर फॉर पोस्ट ग्रॅज्युएट स्टडीज अँड रिसर्च इन आयुर्वेद व आयुर्विद्या मासिक समितीतर्फे डॉ. बोरसे ह्यांचे हार्दिक अभिनंदन!


खासदार मा. श्री. अमर साबळे ह्यांचे हस्ते गौरव स्वीकारताना डावीकडून – सौ. बोरसे, डॉ. न.वि. बोरसे, श्री. साबळे, डॉ. कामठे.

# उपसंपादकीय

## जैविक स्फोटकांच्या उंबरठ्यावर...

– डॉ. सौ. विनया दीक्षित

चीन जगातील सर्वात मोठा व महत्त्वाकांक्षी देश! प्रचंड लोकसंख्या व तंत्रज्ञानातील प्रगती या संघटीत बळांवर साम्राज्याचा विस्तार करण्यास सदैव उत्सुक असा हा देश सध्या corona virus या Zoonotic प्रकारातील विषाणुंमुळे बाधित सर्वात मोठा जनसमुदाय असलेला देश आहे. आजमितीला सुमारे या एकाच देशातील ८०,००० जणांना या विषाणूची लागण झाल्याची सरकारी माहिती आहे व या विषाणूमुळे मृत पावलेल्या चिनी रुग्णांची संख्या अडीच हजारांवर पोहचली आहे.

भारताच्या उत्तरपूर्व सीमांवर जोडलेला हा देश आहे. अनेक भारतीय विद्यार्थी, व्यावसायिक व नोकरदार इथे काम करतात. त्यांच्या सुटकेसाठी भारत सरकार प्रयत्नशील आहे. सर्व आंतरराष्ट्रीय विमानतळावर विषाणूग्रस्त किंवा बाधित रुग्ण ओळखण्यासाठी सुरक्षा चाचणी पथके तैनात आहेत. सध्यातरी 'तीन' भारतीय रुग्णांना बाधा झाल्याचे निष्पन्न झाले आहे व ह्यांना स्वतंत्र वैद्यकीय रुग्णालयीन कक्षांमध्ये सर्वोतोपरी सेवा सुविधा देण्यात येत आहे.

इराण, सिंगापूर, हाँगकाँग, द. कोरिया अशा इतर ४२ देशांमध्ये ही कोरोनाची लागण भयावह गतीने पसरत आहे. श्वासावाटे पसरणाऱ्या या प्रकारच्या विषाणूंची लाट गेल्या काही दशकांत सातत्याने विविध रूपात डोके वर काढत आहे. सार्स, स्वाइन फ्लू आणि आता कोरोना–संपूर्ण जनजीवन अल्पावधीतच धुळीला मिळवण्याचे सामर्थ्य या विषाणूंच्या संसर्गात आहे. जेवढे Global Village संकल्पनेचे फायदे अनुभवले जातात. तेवढेच संपर्क–प्रवास व संसर्गाचे हे अतीतीव्र तोटे ही त्रास देतात.

मानवाची प्रगती आधुनिकतेने चकाकणारी असली तरी नीतीनियम मोडणाऱ्या स्वैराचाराची काळी सावली ही त्यास घट्ट धरून आहे. एडस् काय किंवा आत्ताचा कोरोना काय हे रोग निर्माते व मानवी जीवनाचे विध्वंसक विषाणू प्राण्यांकडून माणसाकडे चुकीच्या मार्गाचा अवलंब केल्यानेच आले आहेत. निसर्गनियमांची पायमल्ली केल्याची सडेतोड शिक्षा निसर्ग चक्रातून समोर येते आहे. चीनच्या वुहान या एका हुबेई प्रांतात आगीप्रमाणे भडका उडालेला हा आजार त्वरेने कितीतरी मैल दूरवर देशविदेशांत झपाट्याने पसरत आहे व सर्वच मानवी जीवनाला ग्रासू पाहात आहे.

या प्रकारच्या स्थितीत मानवाच्या ज्ञानाच्या सीमा, वैद्यकीय क्षेत्रातील अपुऱ्या व्यवस्था व प्रचंड लोकसंख्येच्या रेट्याने चिघळणारे प्रश्न यांच्या दाहक वास्तवाची जाणीव होते. एरवीच्या आधुनिक जीवनशैलीत दुर्लक्ष केलेल्या अनेक घटकांची मोठी किंमत आरोग्य व जीवन मृत्यूच्या स्वरूपात द्यावी लागत आहे. महायुद्धाचेच हे अधिक हानिकारक स्वरूप आहे. संपूर्ण दशकातील वाढत्या संसर्गाचा विचार करता त्वरीत कुठेतरी थांबण्याचा व सुधारणा घडवून आणण्याचा सामूहिक निर्णय देश पातळीवरच आवश्यक आहे. अन्यथा या आरोग्य घातक लाटा पुन्हा पुन्हा उसळतील व मानवी जीवन गिळंकृत करतील. कदाचित रोगांचा अनाकलनीय उद्रम व चिकित्सा यामुळे वैद्यकीय असाह्यता वाढेल व संपूर्ण समाज एका आरोग्य व जीवन घातकी दहशतवादाच्या भोवऱ्यात सापडेल.

हे कल्पनाचित्र नसून सांख्यिकी शास्त्राचे आधारे रेखाटलेले भविष्य आहे. त्याकडे डोळेझाक करणे परवडणारे नाही. Global warming ने बदलते तापमान या प्रकारच्या रोगकारक विषाणूंचा प्रसार करण्यास अधिकच चालना देते आहे. त्यामुळे निसर्गाशी दोन हात करायचे की हात मिळवून यापुढचे जीवन आखायचे व जगायचे हा निर्णयच पुढील भविष्याचे आरोग्य जपेल!